अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

बोअरवेल सबमर्सिबल पंपसेटस् www.lubipumps.com ®©
50+ YEARS OF PUMPING TRUST
IS : 8034 CE
CUSTOMER CARE NO. 9824200800
Lubi
PUMPS-MOTORS
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण "A" ग्रेड मान्यता प्राप्त प्रमाणपत्र

गुरुगणेश एंटरप्रायजेस - सोलापूर
Ph- 0217-2725363, M.:9423590463/ 9423588463

कुंभारी येथे दारूच्या नशेत पडल्याने दुचाकी चालकाचा मृत्यू

सोलापूर : दारूच्या नशेत दुचाकी चालवताना खाली कोसळल्याने ३५ वर्षीय तरुण गंभीर जखमी होऊन मरण पावला. ही घटना कुंभारी (ता.दक्षिण सोलापूर) येथे बुधवारी रात्रीच्या सुमारास घडली. परशुराम सिध्दाराम चाबुकस्वार (वय ३५ रा.कुंभारी ता.दक्षिण सोलापूर) असे मयताचे नाव आहे. तो काल बुधवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास दारूच्या नशेत दुचाकीवरून घराकडे निघाला होता. गेनसिध्द मंदिराजवळील रोडवर तो खाली कोसळल्याने बेशुध्द झाला होता . त्याला सिध्दाराम (वडील) यांनी बेशुध्द अवस्थेत रिक्षातून घरी नेले होते. त्यानंतर आज गुरुवारी सकाळी त्याला सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो मृतअवस्थेत आढळून आला.

www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. २९ नोव्हेंबर २०२४ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : ६१ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

ठाकरे गटाकडून स्वबळाचा आक्रोश उद्धव यांचे मातोश्रीवर सुरू्य ब्रेनवॉश

सोलापूर/विशेष प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीतील दारूण पराभव उद्धव ठाकरे यांच्यासह त्यांचे पक्ष संघटनेतील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या जिव्हारी लागला असून अस्तित्वाची चिंता भेडसावत असल्याने ठाकरेंच्या मावळ्यांकडून आता स्वबळाचा आक्रोश केला जात आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांच्या भावनांची कदर करून ठाकरे हे महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याच्या मनस्थितीत असल्याचे मुंबईचे वृत्त आहे.

- अस्तित्वाची चिंता सतावतेय,
- आघाडीतून बाहेर पडण्याचा
- विचार डोक्यात घोळतोय



महाविकास आघाडीत सर्वाधिक जागा शिवसेना ठाकरे गटाला मिळाल्या. ठाकरेसेनेने २० जागा जिंकल्या. विधानसभेत पानिपत झाल्यानंतर आता पक्षातील अनेक नेते महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचा सूर आळवू लागले आहेत. पक्षाने स्वबळावर लढावे, असा नेत्यांचा सूर आहे. अनेकांनी त्यांची इच्छा उद्धव ठाकरेंकडे बोलून दाखवली. मुंबई महापालिका निवडणुकीत एकला चलो रेची भूमिका घ्यावी, असे बहुतांश नेत्यांना वाटते. मुंबई महापालिका हातातून गेल्यास शिवसेना आपली अवस्था आणखीन बिकट होऊ शकते,अशी भीती बुधवारी रात्री मुंबईत झालेल्या बैठकीत नेते व कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. .

फेब्रुवारी २०२५ मध्ये मुंबई महापालिकेची निवडणूक होऊ शकते. विधानसभा निवडणुकीत सपाटून मार खाणाऱ्या ठाकरे गटाला आता महाविकास आघाडीत राहायचे की नाही, याचा निर्णय लवकरात लवकर घ्यावा लागेल. त्यांचा निर्णय दुधारी तलावारीसारखा असू शकतो. ठाकरेंची शिवसेना स्वबळावर लढल्यास विरोधी मतांचे विभाजन होऊ शकते. त्याचा थेट फायदा भाजप, शिवसेनेला होण्याची दाट शक्यता आहे.

ठाकरेंनी काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवारसोबत राहण्याचा निर्णय कायम ठेवल्यास परंपरांगत मतदार त्यांच्यापासून दूर जाऊ शकतो. विधानसभा निवडणुकीत याचा ट्रेलर दिसलेला आहे. महापालिका हातून निसटल्यास उरलेसुरलेले शिवसैनिक आणि नेते शिंदेकडे किंवा भाजपकडे जाऊ शकतात,असे गणित या बैठकीत मांडण्यात आले आहे.

मुंबई महापालिकेची शेवटची निवडणूक २०१७ मध्ये झाली. त्यावेळी शिवसेना, भाजप स्वबळावर लढले.

शिवसेनेने ८४, तर भाजपनं ८२ जागा जिंकल्या. त्यावेळी दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी एकमेकांनी विखारी टीका केली होती. २०१२ मध्ये केवळ ३१ जागा जिंकणाऱ्या भाजपने २०१७ मध्ये थेट ८२ जागा खिशात घातल्या. महापालिकेत एकूण २२७ प्रभाग आहेत. सत्ता स्थापनेसाठी ११४ जादुई आकडा आहे. मुंबई महापालिकेवर १९९७ पासून सेना, भाजपची सत्ता आहे. २०१९ मध्ये युती तुटल्यानंतर पालिकेतील समीकरणे बदलली.

मनसेमुळे वाचली अब्रू

विधानसभा निवडणुकीत राज ठाकरेंच्या मनसेमुळे शिवसेना ठाकरे गटाची मोठी नाचक्की टळली. मुंबईत ठाकरे गटाने १० जागा जिंकल्या. तर भाजपने १५, शिवसेनेने ६ जागांवर बाजी मारली. ठाकरे गटाने मुंबईत जिंकलेल्या १० जागांपैकी निम्म्या जागांवर मनसेची भूमिका निर्णायक ठरली. मनसेच्या उमेदवारांनी घेतलेल्या मतांमुळे ठाकरे गटाचे उमेदवार जिंकले,असा अनुमान समोर आला आहे.

ठाकरे बंधू एकत्र येणार का?

मुंबई महापालिका आशियातील सगळ्यात श्रीमंत महापालिका आहे. पालिकेचा अर्थसंकल्प अनेक राज्यांच्या अर्थसंकल्पांपेक्षा मोठा आहे. त्यामुळे शिवसेना उबाठाला महापालिकेवरील सत्ता टिकवावी लागेल. यासाठी आता पक्षाकडे ३ पर्याय आहेत. आघाडीत राहून अधिकाधिक जागा लढवून विजय मिळवायचा पहिला पर्याय पक्षासमोर आहे. दुसरा पर्याय स्वबळावर लढण्याचा आहे. यात पराजयाचा धोका अधिक आहे. तिसरा पर्याय मनसे आणि अन्य पक्षांना सोबत लढण्याचा आहे. त्यासाठी उद्धवसेनेला मनसेशी युती करावी लागेल. सध्याच्या घडीला दोन्ही ठाकरे संकटात आहे. त्यांचे राजकारण धोक्यात आहे. त्यामुळे ठाकरे बंधू एकत्र येणार का याकडे लक्ष लागले आहे.

फॉर्म्युला फिक्स, देवेंद्रभाऊ फायनल?

सोलापूर/विशेष प्रतिनिधी

राज्यातील मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार निश्चित करणे तसेच सत्तेचे सूत्र ठरवण्याकरिता गुरूवारी मध्यरात्रीपर्यंत केंद्रीय मंत्री अमित शाह यांच्या निवासस्थानी महायुतीच्या नेत्यांची बैठक झाली.त्यात कोणते निर्णय झाले हे समजू शकले नाही मात्र,मुख्यमंत्रीपदासाठी भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांचे नाव निश्चित झाल्याचे सांगण्यात येते. शुक्रवारी किंवा शनिवारी मुंबईत विधी मंडळाची बैठक होईल.त्यात फडणवीस यांच्या नावाची घोषणा होईल,असे सांगण्यात आले.या बैठकीत कोणती खाती कोणाकडे असावीत,याबाबतचा फॉर्म्युला ठरवण्यात आल्याचेही सांगण्यात येते.

शाह व भाजपाचे कार्याध्यक्ष जे.पी.नड्डा यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसचे अजितदादा पवार गटाचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल,प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे,अजितदादा पवार,काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस हे उपस्थित होते.बैठकीतील निर्णय जाणून घेण्यासाठी दिल्लीतील मराठी पत्रकार शाह यांच्या निवासस्थानापुढे तळ ठोकून होते.पण त्याबाबत एकाही नेत्याने बाहेर येवून बैठकीची माहिती दिली नाही. बैठक संपल्यानंतर महायुतीचे नेते शुक्रवारी सकाळपर्यंत मुंबईत येतील आणि महायुतीच्या आमदारांना मुंबईला बोलावून घेतील. गुरूवारी किंवा शुक्रवारी विधी मंडळाची बैठक होईल.त्यात मुख्यमंत्रीपदाच्या उमेदवाराची घोषणा करण्यात येईल,असे सांगण्यात आले. महायुतीला बहुमत मिळूनही मुख्यमंत्रीपदाच्या निर्णयाला इतका विलंब का होतो आहे याविषयी राज्यात संभ्रम निर्माण झाला होता. काळजीवाहू मुख्यमंत्री

अजितदादांचा अंदाज

नव्या सरकारचा शपथविधी दरम्यान अजित पवार यांनी ३० नोव्हेंबर किंवा १ डिसेंबर रोजी महाराष्ट्राच्या नव्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी होईल असा अंदाज वर्तवला आहे.

शनिवारी किंवा रविवारी शपथविधी

एकनाथ शिंदे यांनी या पदाच्या शर्यतीत उतरले होते.दरम्यान जास्त जागा जिंकल्यामुळे आता हे पद भाजपकडेच हवे,असा आग्रह नव्या आमदारांनी धरल्यानंतर मुख्यमंत्री निवडीत मोठा पेच निर्माण झाला होता.अखेर निवडीचा चेंडू दिल्लीश्वरांच्या कोर्टात गेला.

शिंदेंच्या चेहऱ्यावरचे भाव चर्चेत

महायुतीच्या या नेत्यांनी अमित शाह यांची भेट घेतली आहे. या भेटीच्या फोटोंची चर्चा रंगली आहे. दिल्लीत एकनाथ शिंदे अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांनी अमित शाह यांची भेट घेतली. दरम्यान एक फोटो चर्चेत आला आहे कारण या फोटोंमध्ये अमित शाह यांच्यासह सगळे दिग्गज नेते हसताना आणि आनंदी दिसत आहेत. अपवाद आहे तो एकनाथ शिंदेंच्या चेहऱ्याचा. एकनाथ शिंदे या फोटोंध्ये उभे आहेत मात्र त्यांच्या चेहऱ्यावर असलेल्या गांभीर्याने लक्ष वेधले आहे. भाजपाने देवेंद्र फडणवीस यांच्या नावाला मुख्यमंत्री म्हणून पसंती दिली आहे हे कळल्यानंतर एकनाथ शिंदे नाराज असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या मात्र, एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेऊन मी नाराज नाही तसेच मी सत्तास्थापनेतला अडसर होणार नाही. पंतप्रधान मोदी आणि शाह जो निर्णय घेतील तो मान्य असेल असे त्यांनी म्हटले आहे. मात्र या फोटोंतली त्यांची बॉडी लँग्वेज हेच सांगते आहे की त्यांना बहुदा हे सगळं पटलेलं नाही.

पराभवाने खचू नका, माझ्यावर विश्वास ठेवा, आमदारकी पेक्षा मोठं कायतरी घेऊन दाखवतो

माजी आ. शहाजीबापू पाटील यांचा निर्धार

सांगोला/प्रतिनिधी

पराभवाने खचू नका, माझ्यावर विश्वास ठेवा, या आमदारकी पेक्षा मोठं कायतरी घेऊन येऊन दाखवतो, त्यामुळे आता तुम्ही रुबाबात राहा, तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेवर शिवधनुष्याचा भगवा फडकवायचा आहे, असा हुंकार माजी आ. शहाजीबापू पाटील यांनी भरला.

विधानसभा निवडणुकीत शिंदेंच्या शिवसेनेला भरघोस यश मिळालं आहे. भाजपनंतर राज्यात सर्वाधिक जागा शिंदेंच्या शिवसेनेने जिंकल्या आहेत. मात्र, या निवडणुकीत एकनाथ शिंदेंच्या बंडाला भक्कम साथ देणारे सांगोल्याचे शहाजीबापू पाटील यांना मात्र पराभवाचा सामना करावा लागला. हा पराभव शहाजीबापू पाटील यांच्या चांगलाच जिव्हारी लागला आहे. शिवाय या निकालामुळे त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये देखील प्रचंड नाराजी आहे. मात्र, याच नाराजीवर मात करण्यासाठी पाटील पुन्हा एकदा राजकारणात सक्रीय झाले आहेत. कारण पराभूत झालेल्या शहाजीबापूंनी थेट मुंबई गाठत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेट घेतली आहे.

मुंबईवरून आल्यावर शहाजीबापू पाटील यांनी चिकमहुद येथे कार्यकर्त्यांची विचारविनिमय बैठक संपन्न झाली. बैठकीसाठी महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, मतदार बांधव, युवावर्ग उपस्थित होता, त्यावेळी शहाजीबापू बोलत होते.

ते म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माझे व शिवसैनिकांचे अतूट नाते आहे. २०२४ विधानसभा निवडणुकीत प्रत्येकाने आपण काय योगदान दिले याचे आत्मचिंतन केले पाहिजे. ही निवडणूक सर्व व्यापक भावनेवर गेली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, गुलाबराव पाटील यांनी सांगोला तालुक्याच्या विकासासाठी निधीचे मोठे योगदान दिले. दीपकआबा म्हणतात बापूंनी मला पाठिंबा द्यायला हवा होता. मी दीपकआबांना लहान भाऊ मानून आमदारकीचे ५०% अधिकार दिले हे शिवसैनिकांना दिले असते तर माझा पराभव झाला नसता. या निवडणुकीत मतदार बंधू - भगिनींनी ९१ हजार मते देऊन त्यांची जबाबदारी पूर्ण केली हे काही कमी नाही. मला येत्या दोन महिन्यात मोठे पद मिळेल, तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेवर शिवधनुष्याचा भगवा फडकववायचा आहे, त्यामुळे खचून जाऊ नका, असा धीर शहाजीबापूंनी कार्यकर्त्यांना दिला.

यावेळी सांगोला मतदार संघातील पदाधिकारी दादासाहेब लवटे, दीपक पवार, विजय शिंदे, रमेश बनसोडे, विकास मोहिते, नवनाथ माने, धनाजी कवडे, राजेंद्र खांडेकर, परमेश्वर साळुंखे, खंडू सातपुते, शहाजी यादगे, दामोदर साठे, सुनील शिंदे, दत्तात्रय नागणे, विजय पाटील, धनाजी चव्हाण, ड. महादेव कांबळे, विजय बनसोडे आदींसह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

एकही काम आडू देणार नाही

आमदार शहाजीबापू पाटील म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सांगोला तालुक्यावर व माझ्यावरती खूप मोठे प्रेम व उपकार आहेत. अडीच वर्षात तब्बल ५ हजार ५०० कोटी रुपये विकास निधी मिळाला. पराभव झाला असला तरी अखेरच्या श्वासापर्यंत तालुक्यातील जनतेच्या विश्वास पात्र राहून एकही काम आडू देणार नाही. कोणी अडवणूक करण्याचा प्रयत्न केल्यास ते खपवून घेणार नाही. यापुढेही सांगोला तालुक्याच्या विकासासाठी मोठे योगदान देण्यास सदैव तत्पर आहे, अशी ग्वाही मा. आमदार शहाजीबापू पाटील यांनी दिली.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

थोडी ऊब घेतो, मदतीच्या निमित्ताने..!

कल्याण
370-09-144
मुंबई
168-54-257